जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि. २७/०३/२०२०

प्रति,
सर्व तहसिलदार,
नांदेड जिल्हा

विषयः- **आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ अन्वये कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तालुकास्तरीय समन्वय अधिका-यांच्या नियुक्त्या करणेबाबत.**

संदर्भः- या कार्यालयाचे आदेश दिनांक २६.०३.२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यांच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर येणा-या अडीअडचणी व तक्रारीच्या निवारणासाठी संदर्भीय आदेशान्वये, जिल्हास्तरीय समन्वय अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर आदेशाची प्रत आपणास माहितीस्तव देण्यात आली आहे. तथापि सुलभ संदर्भासाठी पूनश्च यासोबत देण्यात येत आहे.

सबब, याद्वारे आपणास निर्देशित करण्यात येत आहे की, आपल्या तालुक्यात सुध्दा कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपायोजनाच्या अनुषंगाने तालुका स्तरावरील प्रशासनातील अधिका-यांची वर नमुद प्रमाणे समन्वय अधिकारी म्हणून आदेश पारीत करुन जिल्हा स्तरीय समन्वय अधिका-यांशी सतत संपर्कात रहावे.

या कामात कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्या कडून कुचराई/दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपायोजना नियम २०२० मधील तरतुद व आपत्ती व्यवस्थापना अधिनियम २००५ च्या कलम ५१ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**(सोबतः-संदर्भीय आदेशाची प्रत/-)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रतिलिपीः**-सर्व उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड